# प्रेसनोट

दिनांक १९/११/२०१८

**भुजंग साहेबराव सुर्यवंशी, निमताणदार, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, कोपरगांव जि.अहमदनगर यांना तक्रारदार यांचेकडुन २००० रुपयांची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडले.**

प्रस्तुत बातमीतील हकिगत अशी की, तक्रारदार यांच्या गांवातील परिचयाचे वयोवृध्द इसम यांनी खरेदी केलेल्या कोळपेवाडी (कोळगांवथडी) येथील मोकळया जागेची दप्तरी नोंद करण्यासाठी लोकसेवक भुंजग साहेबराव सुर्यवंशी वय ४४ वर्षे, निमताणदार, उप अभिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, कोपरगांव जिल्हा अहमदनगर रा. कांदा मार्केट मागे, नेवासा रोड श्रीरामपुर जिल्हा अहमदनगर यांनी तक्रारदार यांचेकडेस ३,०००/– रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती २०००/– रूपये लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडुन पंच साक्षिदारासमक्ष उप अभिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, कोपरगांव जिल्हा अहमदनगर येथे स्विकारतांना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

सदर सापळा कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर युनिटने केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयामार्फत सर्व सामान्य जनतेला आवाहन करण्यात येते की, त्यांना कोणी शासकिय नोकर शासकिय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी करत असेल तर त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, अहमदनगर येथे संपर्क साधावा.

| **कार्यालयाचा पत्ता** | **पोलीस उप अधीक्षक कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही.सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर** |
|---|---|
| फोन नंबर | ०२४१–२४२३६७७. |
| टोल फ्रि नंबर | १०६४ |

( श्याम रा. पवरे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहमदनगर.

Scanned by CamScanner